क्र.अ.का./एमएजी/डे-२७/कावी/२१६ /२०१६
जिल्हाधिकारी अमरावती यांचे कार्यालय,
दिनांक :- २१ /३/२०१६

विषय :- विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूका रद्द करुन नव्याने नियुक्त्या करण्याबाबत.

संदर्भ :- सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.विकाअ १११५/९४/प्र.क्र.८०/का.५ दि.२/२/२०१६

**आदेश**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.विकाअ-१११५/ प्र.क्र.८८/५ दिनांक ३१/१२/२०१५ अन्वये राज्यातील विशेष कार्यकारी अधिकारी यांचे नेमणूकांबाबत सुधारित धोरण ठरविण्यात आले आहे. राज्यातील सर्व जिल्हयामध्ये नियुक्त विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्त्या रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तरी यापूर्वी करण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या (पदसिध्द नियुक्त्या वगळता) रद्द करुन त्याबाबतचे आदेश वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत सुचित केले आहे. शासनाने निर्देशित केल्यानुसार सोबत जोडलेल्या यादीनुसार अमरावती जिल्हयातील विशेष कार्यकारी अधिकारी पदावरील एकूण २२८३ नियुक्त्या रद्द करण्यात येत आहे. संबंधीतांनी त्यांचे कडील विशेष कार्यकारी अधिकारी पदाचे आोळखपत्र व रबरी शिक्का इ.साहित्य संबंधीत पोलीस स्टेशनला तातडीने जमा करावेत.

(किरण गित्ते)
जिल्हादंडाधिकारी, अमरावती

प्रतिलीपी :-
१) सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस सादर.
२) पोलीस आयुक्त,अमरावती/पोलीस अधिक्षक, अमरावती (ग्रामीण) यांना कार्यवाहीस.
३) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जि.का,अमरावती यांना माहिती करीता व कार्यवाहीस. उपरोक्त नमुद माहिती अमरावती जिल्हा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

जिल्हादंडाधिकारी, अमरावती

spl exe officer 34

विषय:- विशेष कार्यकारी  अधिकारी पदावर नियुक्तीबाबत.